**ठळक बातम्या**

- छत्तीसगडमधे रायपूर इथं आयोजित करण्यात आलेल्या पोलीस महासंचालक आणि पोलीस महानिरीक्षकांच्या परिषदेत प्रधानमंत्र्यांचा सहभाग

- राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या १४९ व्या तुकडीचा दीक्षांत सोहळा संपन्न

- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पहिल्या टप्प्यात प्रचाराला जोर

- दरेकसा दलमच्या 11 जहाल नक्षलवाद्यांची गोंदिया पोलिसांकडे शरणागती

आणि

- सुलतान अझलनशाह हॉकी स्पर्धेच्या अंतिम फेरीत भारताचा प्रवेश

<><><><><>

छत्तीसगडमधे रायपूर इथं आयोजित करण्यात आलेल्या पोलिस महासंचालक आणि पोलीस महानिरीक्षकांच्या परिषदेला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज आणि उद्या उपस्थित राहणार आहेत. परिषदेच्या विविध सत्रांचे अध्यक्षस्थान ते भूषवतील तसंच विशिष्ट सेवेसाठीची राष्ट्रपती पोलिस पदकं विजेत्यांना प्रदान करतील.

तीन दिवस चालणाऱ्या या परिषदेचं उद्घाटन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते काल झालं.

<><><><><>

देशाला बदलत्या तंत्रज्ञानानुसार आत्मनिर्भर होण्यासाठी सैन्य दलात दाखल होणाऱ्या छात्रांनी सक्षम असणे आवश्यक असल्याचं प्रतिपादन केंद्रीय लोकसेवा आयोगाचे प्रमुख डॉ. अजय कुमार यांनी आज पुण्यात केलं. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या १४९ व्या तुकडीच्या दीक्षांत सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी ३२९ स्नातकांना त्यांनी पदवी प्रदान केली. त्यापैकी १५ मित्र देशातले आणि १५ महिला आहेत. विज्ञान शाखेचं रौप्य पदक कार्तिक महेश्वरी, संगणक विज्ञानातलं रौप्य पदक अनन्या बालोनी, कला शाखेतलं रौप्य पदक अनुराग गुप्ता, बी टेक रौप्य पदक पुण्याचा विश्वेष भालेराव यांना मिळालं.

<><><><><>

निलगिरी प्रकारातील तारागिरी युद्धनौका काल भारतीय नौदलाला सुपूर्द करण्यात आली. माझगाव डॉक शिपबिल्डिंग लिमिटेड कंपनीनं तयार केलेली ती भारतीय बनावटीची तिसरी युद्धनौका आहे. वॉरशिप डिझाइन ब्युरोने या जहाजाची रचना केली आहे आणि मुंबईच्या वॉरशिप ओव्हरसीइंग टीमच्या देखरेखीत ते तयार झाले आहे.

भारतीय नौदलाच्या ताफ्यात ३३ वर्षे अखंड सेवा दिलेल्या आयएनएस तारागिरीचेच हे पुनर्निमाण आहे. आयएनएस तारागिरी हे जहाज १६ मे १९८० ते २७ जून २०१३ या कालावधीत नौदलाचा भाग होते.

<><><><>

२०२६-२७ साठी आंतरराष्ट्रीय सागरी संघटना अर्थात IMO च्या परिषदेवर भारताची पुन्हा निवड झाली आहे. काल लंडन इथं झालेल्या IMO असेम्ब्लीच्या ३४व्या सत्रादरम्यान परिषदेच्या निवडणुका घेण्यात आल्या. आंतरराष्ट्रीय सागरी व्यापारात सर्वाधिक सहभाग असलेल्या दहा देशांच्या श्रेणीमध्ये भारताला सर्वाधिक म्हणजे १६९ वैध मतांपैकी १५४ मते मिळाली. केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी या बद्दल आनंद व्यक्त केला.

<><><><>

राज्यातल्या २४३ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकीसाठी राज्यभरात सर्वपक्षीय नेते आणि कार्यकर्ते आपापल्या उमेदवारांचा प्रचार करत आहेत. विविध पक्षांच्या ज्येष्ठ नेतेही जोरदार प्रचार करत मतदारांना आपापल्या उमेदवारांना मत देण्याचं आवाहन करत आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वाशिम जिल्ह्यातल्या नगरपरिषद निवडणुकीसाठी वाशिम इथं प्रचारसभा घेतली. नगरपालिका निवडणूक ही सामान्य लोकांच्या जीवनात परिवर्तन घडवण्याचं साधन आहेत, असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या गंगापूर इथं भाजपाचे खासदार डॉक्टर भागवत कराड यांनी तर कन्नड इथं आमदार संजय जाधव यांनी प्रचारसभा घेतली. धाराशिवमधे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी काल शिवसेना उमेदवारांच्या प्रचारासाठी सभा घेतली.

लातूर जिल्ह्यातल्या उदगीर इथं माजी मंत्री अमित देशमुख यांची सभा काल झाली. यावेळी त्यांनी सत्ताधाऱ्यांवर जोरदार टीका केली. या सभेला खासदार शिवाजी काळगे

यांच्यासह इतर नेते उपस्थित होते. बीड जिल्ह्यातल्या अंबाजोगाई नगरपरिषद निवडणुकीसाठी आमदार नमिता मुंदडा यांनी काल शहरातल्या महिलांशी संवाद साधला.

दोन डिसेंबरला नगरपरिषद आणि नगरपंचायतीची निवडणूक होणार असून एक डिसेंबरला रात्री दहा वाजेपर्यंत उमेदवारांना प्रचार करता येणार आहे.

<><><><>

केंद्र सरकारच्या चार नव्या कामगार कायद्यांवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार अरविंद सावंत यांनी टीका केली आहे. हे कायदे कामगारांचे अधिकार नष्ट करून अनिश्चितता तयार करतील, असे सावंत म्हणाले. भारतीय कामगार सेना या कायद्यांच्या अंमलबजावणीला विरोध करेल. या कायद्यांना न्यायालयात आव्हान दिले जाईल, असे त्यांनी माध्यमांना सांगितले.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या रविवारी सकाळी ११ वाजता आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. या मालिकेचा हा १२८वा भाग असेल. हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शन नेटवर्क, वेबसाइट तसंच न्यूजऑनएयर मोबाइल ॲपवर प्रसारित केला जाईल.

<><><><>

नक्षल संघटनेतला वरिष्ठ नेता अनंत उर्फ विनोद साय्यणा याच्यासह ११ नक्षली अतिरेक्यांनी काल गोंदिया पोलिसांसमोर आत्मसमर्पण केलं. यामुळं नक्षल चळवळीला मोठा हादरा बसला आहे. हे सर्वजण दरेकसा दलम या नक्षल गटाचे सदस्य होते असं गडचिरोली रेंज चे पोलीस उपमहानिरीक्षक अंकित गोयल यांनी सांगितलं. यावेळी पोलिसांनी नक्षलवाद्यांकडून मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठाही जप्त केला आहे. या सर्व नक्षलवाद्यांवर सरकारनं 89 लाख रुपयांचं बक्षीस जाहीर केलं होतं. गेल्याच आठवड्यात शरणागतीसाठी मुदत मागणारं पत्र अनंत ने महाराष्ट्रासह ३ नक्षलग्रस्त राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना लिहीलं होतं.

<><><><>

केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमाशुल्क मंडळाच्या अध्यक्षपदी महसूल सेवेतले ज्येष्ठ अधिकारी विवेक चतुर्वेदी यांची नेमणूक झाली आहे. ते१९९०च्या तुकडीतले अधिकारी

असून  यापूर्वी त्यांनी महसूल गुप्तवार्ता संचालनालयात विविध पदांवर काम केलं आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीने चतुर्वेदी यांच्या नेमणुकीचा प्रस्ताव मंजूर केला. सध्याचे अध्यक्ष संजय अग्रवाल उद्या सेवानिवृत्त होणार असून चतुर्वेदी त्यांचा कार्यभार घेतील.

**<><><><><>**

भारताचा हॉकी संघ सुलतान अजलनशाह चषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचला आहे. इपोह इथं झालेल्या उपान्त्य सामन्यात भारतानं कॅनडावर १४ विरुद्ध ३ अशा गोलफरकाने दणदणीत विजय मिळवला. जुगराज सिंगने ४ गोल केले.

**<><><><><>**

श्रीलंकेत दितवाह चक्रीवादळामुळे झालेल्या दुर्घटनांमधल्या मृतांचा आकडा ६९ वर पोहोचला असून, ३४ जण अजूनही बेपत्ता आहेत.  तिथल्या दोन लाखापेक्षा जास्त जणांना या वादळाचा फटका बसला असून, मदत आणि बचाव कार्य वेगानं सुरु आहे.  वादळग्रस्त श्रीलंकेच्या मदतीसाठी भारतानं ऑपरेशन सागर बंधू ही मोहीम हाती घेतली आहे. या मोहीमेअंतर्गत वैद्यकीय मदतीचा ८० टन साठा घेऊन एक विशेष विमान श्रीलंकेला पोहोचलं. त्याआधी आयएनएस विक्रांत आणि आयएनएस उदयगिरी या भारतीय युद्धनौकांनी श्रीलंकेला मदत साहित्य पोहचवलं. भारतानं राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या ८० कर्मचाऱ्यांचा समावेश असलेली दोन शोध आणि बचाव पथकं श्रीलंकेला पाठवली असल्याची माहिती परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी दिली आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या नुकसानीबद्दल शोक व्यक्त केला असून, श्रीलंकेला सहकार्य करण्याची वचनबद्धता पुन्हा एकदा व्यक्त केली आहे.

आता हे चक्रीवादळ तामिळनाडूचा उत्तर भाग, पुदुच्चेरी, आणि आंध्र प्रदेशाच्या दक्षिण भागाजवळ पोहोचेल अशी शक्यता आहे.

दरम्यान येत्या चोवीस तासात तामिळनाडू, पुद्दुचेरी आणि काराईकल मध्ये जोरदार ते मुसळधार पडेल होईल असा अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागानं वर्तवला आहे. आंध्र प्रदेशातही जोरदार ते अति जोरदार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. केरळ, माहे आणि कर्नाटकाच्या दक्षिण भागातही जोरदार पाऊस होण्याचा अंदाज आहे.

**<><><><><>**

दिल्लीतल्या विशेष न्यायालयानं कुख्यात गँगस्टर अनमोल बिश्णोईच्या एनआयए कोठडीत ७ दिवसांची वाढ केली आहे. अमेरिकेतून प्रत्यार्पण झाल्यानंतर तो ११ दिवसांच्या एनआयए कोठडीत होता. आता त्याची कोठडी ५ डिसेंबर पर्यंत वाढली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दीकी यांची हत्या, अभिनेता सलमान खानच्या घरावर झालेला गोळीबार यासह अनेक गुन्ह्यांमध्ये त्याचा हात होता.

**<><><><><>**

पालघर जिल्ह्यातल्या विक्रमगडच्या नगराध्यक्षाला पोलिसांनी आज अटक केली. बनावट कागदपत्रांच्या आधारे १११ कोटी रुपये हडपण्याचा प्रयत्न त्याने केला होता. सार्वजनिक बांधकाम विभागाचं बनावट पत्र बँकेत सादर करुन हे पैसे घेण्याचा प्रयत्न त्यानं केला. पण बँकेतल्या कर्मचाऱ्यांना शंका आल्यानं त्यांनी पडताळणी केली, तेव्हा हा बनाव उघड झाला.

**<><><><><>**

पालघर जिल्ह्यात पोलिसांनी भेसळयुक्त दारू तयार करणारं एक रॅकेट उद्धवस्त केलं. या कारवाईत १२ लाख रुपयांची दारू जप्त करण्यात आली आणि एका आरोपीला अटक केली.  आरोपी दिव दमण आणि गोव्यातून स्वस्त दारू खरेदी करत त्यात रसायनं मिसळून महागड्या ब्रँडच्या बाटल्यांमधून विकत होता.

**<><><><><>**

पंजाब नॅशनल बँक घोटाळ्यातील मुख्य आरोपी मेहुल चोकसी याची याचिका मुंबईच्या एका विशेष न्यायालयानं फेटाळली आहे. आपल्याला फरारी आर्थिक अपराधी घोषित करण्याची कार्यवाही रद्द करावी अशी मागणी चोकसी यानं या याचिकेद्वारे केली होती. त्याला एप्रिल महिन्यात बेल्जियम येथून अटक करण्यात आली आहे.

**<><><><><>**

ठाणे पोलीसांनी केलेल्या कारवाईत एक सेक्स रॅकेट उध्वस्त केले. या प्रकरणी थायलंडची नागरिक असलेल्या एका महिलेला अटक केली आहे, तर थायलंडच्याच नागरिक असलेल्या दोन महिलांची सुटका केली गेली अशी माहिती कासारवडवली पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्यांनी दिली.

अटक केलेली महिला वेश्याव्यवसायासाठी परदेशी नागरिकांचा पुरवठा करत असल्याची माहिती मिळाली होती, त्याआधारे ही कारवाई केली. अटक केलेल्या महिलेचा आणि सुटका केलेल्या पीडितांच्या व्हिसाची मुदत संपलेली होती, असं पोलिसांनी सांगितलं.

अटक केलेल्या महिलेविरोधात भारतीय न्याय संहिता आणि अनैतिक मानवी तस्करी प्रतिबंधक कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे, आणि दोन्ही पीडितांना शासनाच्या मान्यताप्राप्त महिला निवारागृहात हलवलं असल्याचंही पोलीसांनी सांगितलं.

**<><><><><>**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री श्रीप्रकाश जायस्वाल यांचं काल रात्री कानपूरमधे हृदयविकारानं निधन झालं. ते ८१ वर्षांचे होते. मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वातल्या मंत्रिमंडळात त्यांनी गृह खात्याचं राज्यमंत्रिपद तसंच कोळसा विभागाचं मंत्रिपद भूषवलं होतं. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि इतर पदाधिकाऱ्यांनी जायस्वाल यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, समाजवादी पार्टीचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनीही दिवंगत जायस्वाल यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं असून आदरांजली वाहिली आहे.

**//<><><><><>//**